**राम नाईक**
पूर्व पेट्रोलियम मंत्री

9 शिवस्मृति, 51, जयप्रकाश नगर
गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063.
दूरभाष : 022-2686 33 39, फैक्स : 022-2686 11 33
ई मेल : ramnaik@vsnl.com

कृपया प्रसिध्दीसाठी -

24 ऑगस्ट 2008

## बॉम्ब स्फोटामुळे अपंग झालेल्या हंसराजला
## राम नाईकांच्या प्रयत्नांमुळे अखेर नोकरी मिळणार

**मुंबई, रविवार :** माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी सतत दोन वर्षे केलेल्या पाठपुराव्यानंतर 11 जुलै 2006 च्या बॉम्ब स्फोटात उजवा पाय गमावलेला अपंग तरुण श्री.हंसराज कनौजिया याला अखेर पश्चिम रेल्वे प्रशासनाने नोकरी देऊ केली आहे.

या संदर्भात तपशीलवार माहिती देताना श्री.राम नाईक म्हणाले, "मोटार मेकॅनिक म्हणून एका छोट्या गॅरेजमध्ये नोकरी करणारा श्री.हंसराज कनौजिया हा 11 जुलै 2006 च्या बॉम्ब स्फोटातील शेकडो जखमींपैकी एक. या स्फोटामुळे हंसराजला आपला उजवा पाय गमवावा लागला. एका दुर्दैवी कहाणीची तिथून सुरुवात झाली." अनेकदा खेटे घालूनही जाहीर केलेली आर्थिक नुकसान भरपाईही न मिळाल्याने हंसराज अखेर श्री.राम नाईक यांना भेटला. रेल्वे मंत्री, पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक, आदींशी केलेल्या पत्रव्यवहारानंतर हंसराजला आर्थिक नुकसान भरपाई मिळाली. केवळ त्या मदतीवर 10 वी पास हंसराजला आपलं आणि आपल्या लहानग्या तीन मुलांचं उर्वरीत आयुष्य व्यतीत करता येणं अशक्यच होतं. पुन्हा एकदा उभारी धरुन नोकरी शोधणा-या हंसराजला अपंगत्वामुळे सगळीकडून नकारघंटा मिळू लागली. रेल्वे मंत्र्यांनी बॉम्ब स्फोटात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना आणि कायमचे अपंगत्व आलेल्यांना नोकरी देण्याचे जाहीर केले होते. वृत्तपत्रांमधून तशा जाहीरातीही झळकल्या. त्यामुळे हंसराजला रेल्वे प्रशासन नोकरी देईल असे श्री.राम नाईक यांना वाटत होते.

हंसराजचा उजवा पाय गेल्याने केंद्र सरकारच्या अखत्यारीतीलच हाजी अलीच्या अपंग पुनर्वसन केंद्राने हंसराजला 80 टक्के अपंगत्वाचा दाखलाही दिला होता. त्यामुळे ही नोकरी मिळण्यात अडचण येणार नाही असे वाटत असतानाच रेल्वे मंत्रालयाच्या वैद्यकीय तपासणी मंडळाने हंसराजच्या अपंगत्वामुळे त्याची कमाईची क्षमता अवघ्या 35 टक्क्यांनीच कमी झाली आहे असा जावई शोध लावला. त्याला अपंगत्वाच्या आधारे नोकरी देता येणार नाही असे पश्चिम रेल्वेच्या महाव्यवस्थापकानीं श्री.नाईक यांना पत्राव्दारे कळविले. या क्रूर थट्टेमुळे हंसराजचे मनोधैर्यच खचले. तथापि, श्री.राम नाईक यांनी हंसराजला नोकरी मिळवून द्यायचीच असा निर्धार केला.

..2..

निवास : बी-503, लक्षचंडी अपार्टमेंट, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, कृष्णवाटिका रास्ता, गोकुळधाम, गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063 • दूरभाष : 022-2841 33 99, फैक्स : 022-2842 33 99

**राम नाईक**
पूर्व पेट्रोलियम मंत्री

9 शिवस्मृति, 51, जयप्रकाश नगर
गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063.
दूरभाष : 022-2686 33 39, फैक्स : 022-2686 11 33
ई मेल : ramnaik@vsnl.com



गेल्या वर्षभरात या प्रकरणात रेल्वे मंत्र्यांनी दखल द्यावी यासाठी सतत पत्रे पाठवून श्री.राम नाईक यांनी रेल्वे मंत्री श्री.लालू प्रसाद यादव यांच्या भेटीची मागणी केली. रेल्वे बोर्डाने यासाठी नियमांत सुधारणा करणे आवश्यक असल्यास तसे करावे यासाठी रेल्वे बोर्डाच्या अध्यक्षांकडेही चर्चेसाठी वेळ मागितला. 2007 मध्ये 12 जून, 20 जून, 11 सप्टेंबर, 11 ऑक्टोबर, 19 ऑक्टोबर, 1 डिसेंबर, 19 डिसेंबर, 26 डिसेंबर आणि 31 डिसेंबर या तारखांची एकूण नऊ पत्रे पाठविली. 31 डिसेंबरला रेल्वे बोर्ड अध्यक्षांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्याशी चर्चाही केली. तरीही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने हंसराज अतिशय निराश झाला. शेवटी 14 एप्रिल 2008 ला अंतिम विनंती करणारे निर्वाणीचे (SOS) पत्र श्री.नाईक यांनी रेल्वे मंत्र्यांना पाठविले. त्यालाही उत्तर न आल्याने अखेर हंसराजसाठी न्यायालयात धाव घेण्याचा निर्णय श्री.नाईक यांनी केला.

ॲड.अनिल सिंह यांनी हंसराजच्या वतीने 3 मे 2008 रोजी उच्च न्यायालयात न्यायमूर्ती श्री.आर.एम.एस.खंडेपारकर व न्यायमूर्ती श्री.ए.ए.सय्यद यांच्या खंडपीठापुढे रिट याचिका दाखल केली. या खंडपीठाने रेल्वे प्रशासनाला नोटीस बजावली. त्यानंतर न्यायमूर्ती पी.बी.मजमुदार व न्यायमूर्ती ए.ए.सय्यद यांच्या खंडपीठापुढे ही याचिका सुनावणीसाठी आली असता 20 ऑगस्ट रोजी त्यांनीही उचित कारवाई तातडीने करण्यात यावी असे रेल्वेच्या वकिलाना चर्चेत सूचविले. अर्थात याचिकेची सुनावणी अद्याप पूर्ण झालेली नाही.

या सर्व रेट्यामुळे अखेर पाषाणहृदयी रेल्वे प्रशासनाला पाझर फुटून त्यांनी हंसराजला अपंगांसाठीच्या 'डी' प्रवर्गात नोकरी देऊ करणारे पत्र नुकतेच पाठविले. आता वैद्यकीय परीक्षेतही नोकरीला पात्र ठरलेला हंसराज लवकरच कामावर रुजू होईल. "पाय गमावलेला हंसराजला सध्या जयपूर फूट मिळाला आहे, पण रेल्वे मंत्र्यांची संवेदनहीनता व संवादशून्यता आणि लालफितीचा कारभार यांवर मात करुन आता तो आर्थिकदृष्ट्याही आपल्या पायावर उभा राहील याचे मला मोठे समाधान वाटते," अशी प्रतिक्रिया श्री.राम नाईक यांनी व्यक्त केली.

(कार्यालय सचिव)

संलग्न : फोटो.

निवास : बी-503, लक्षचंडी अपार्टमेंट, जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग, कृष्णवाटिका रास्ता, गोकुळधाम, गोरेगाव पूर्व, मुंबई 400 063 • दूरभाष : 022-2841 33 99, फैक्स : 022-2842 33 99